# Urban Credit And Salary Earners' Co-operative Societies

## 1) Organization And Registration of Societies :

Norms for Registration of Urban Credit Societies and Salary Earners' Societies

(Policy Circular No. URB /64/Registration/E-1 of 1981, dated the 30th December 1981, from the commissioner for Co-operation and Registrar, Co-operative Societies, Maharashtra State, Pune)

The economic condition in the country has undergone considerable change during the last decade. The overall progress made by the country in agriculture, industry, trade and commerce has resulted in the income level of the masses. In the context of these changed economic conditions, the question of laying down the norms for registration of urban co-operative credit societies and salary earners' co-operative credit societies afresh in supersession of this Office Circular No. SES-2Fin, dated 25th November 1968 and letter No. Nagri/401/VI/472, dated 28th January 1969 addressed to District Deputy Registrar for information and necessary action was under consideration of this Office for some time past. The question has been examined with reference to economic viability of these institutions during their infancy vis-a-vis their utility to the members in meeting their needs, and the following norms are prescribed for the guidance of registering authorities and the field staff of the Department.

## 2) Urban Co-operative Credit Societies :

(i) **Byelaws :**

As per the new licencing policy about the registration of Urban Co-operative Banks as circulated to all Registrars, Co-operative Societies, by the Reserve Bank of India under its letter, dated 12th October 1981, a copy of which is enclosed with this Office letter, No. URB/64/Regn./ E-I, dated 30th November 1981, no new primary credit society or a salary earners' society with a paid up capital of less than Rs. One lakh should be registered with a provision in its byelaws for raising deposits from non-members (Public). Therefore, due care should be taken to see that the byelaws of the new Primary credit society and salary earners' Society do not contain a provision in the byelaws for acceptance of deposists from non-members (Public).

ii) **Area of Operation :**

With a view to avoiding overlapping of area of operation and membership of different urban credit societies operating in the same township of the city and also to avoid multiple borrowing by the same person from different societies at one and the same time, it is necessary to restrict the area of operation of each of such societies to a given locality of the town or city. Secondly, with a view to preserving the co-operative character of the institution and bring necessary cohesion amongst its members, it is also necessary to see that its area of

operation is as compact as possible. This creteria should not of course be applied in isolation of the important consideration of economic viability of the proposed society. If economic viability cannot be achived in the area of operation, with population coverage as per the prescribed norms, due to any peculiar nature of the economic condition of the town or the city, there is no objection to allow a larger area of operation covering more than the prescribed population. But in any case overlapping of area of operation of two or more societies should be avoided.

The norms regarding area of operation, population coverage initial membership, initial share capital, achievement of loaning programme within a period of first three years by a society to be registered in semi-urban areas, urban areas and municipal cities etc. are prescribed in the table given under para (iii) below.

iii) **Membership, initial share capital and loaning programme :**

Adequacy of initial membership and initial share capital, potentiality for loaning operation are the main considerations and requirements for successful beginning of an urban credit society like any other co-operative society. These components of the physical and financial structure of a society together with the potentiality for working business are very important from its economic viability point of view in-as-much as the society would be able to raise adequate working capital by way of deposits (from members only) and loans from the Central Financing Agency, where its share capital base is sufficiently strong. The membership of an urban credit society would normally be drawn from persons engaged in different occupations such as trade, commerce, small scale industries, self-employment, employment in Government and Semi-Government bodies etc. and since the costs of commodities and services are quite high at present as compared to their costs about 10 to 15 years before, the quantum of loan required by members of such an urban credit society would naturally be on higher scale than in the past. It is, therefore, absolutely necessary for a society to raise sizeable share capital right since its inception in order to enable it to raise adequate outside borrowing and have a working capital or sizeable magnitude to meet the loan requirements of members. Based on these considerations, the initial membership of a new urban credit society and its loaning programme to be achieved within a period of first 3 years should be as stipulated in the following table :

Norms regarding area of operation, initial membership and share capital and loaning programme of Urban Credit Societies, other than for Backward Class persons and persons engaged in petty occupations.

(Rs. in lakhs)

| Nature of the Urban Centre | Area of operation | Population coverage not less than | Initial membership | Initial share capital (face value of each share to be of Rs. 10) | Loans and advances programme to be achieved within a period of first 3 years |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1) Greater Bombay, Pune and Nagpur | 1 Ward | 25,000 | 500 (to be raised to 1,000 within a period of first three years). | 25,000 | 3.00 |
| 2) Municipal Corporation city | 1 Ward | 20,000 | 300 (to be raised to 500 within a period of first three years). | 20,000 | 2.50 |
| 3) Municipal City Wards | 2 to 3 | 15,000 | 250 (to be raised to 400 within a period of first three years) | 15,000 | 2.00 |
| 4) Other urban and Semi-urban centre (without Municipality) | Suitable zone(s) keeping in view the homo-genity of the area. | Non-agri-cultural Population 7,000. | 200 (to be raised to 300 within a period of first three years). | 12,000 | 1.50 |

**N.B. :** 1) The area of operation as shown in col. 2 may be extended suitably if population coverage as prescribed under col. 3 so requires.

2) The registration proposals of the Urban Credit Societies which are received for registration in 'Other Urban and Semi-urban Centres' should be got cleared of from the District Deputy Registrar, Co-operative Societies of the district concerned.

**3) Norms for registration of Urban Credit Societies for Backward Class persons and for persons engaged in petty occupations :**

It is felt necesary to organise Urban Credit Societies for the uplift of Backward Class persons and persons engaged in petty occupations like petty vegetable vendors scrap collectors, hand-cart pullers and coolies etc. and hence the following norms are prescribed for registration of such societies :

**Type of Society : For Backward Class persons and for persons engaged in petty occupation**

| | In metropolitan and Municipal Corporation City | In Municipal City and other Urban and Semi-urban Centre |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| Area of operation | One ward | i) In Municipal City 2 to 3 wards.<br>ii) In urban and semi-urban centre suitable zone keeping in view the homogein ty of the area. |
| Initial membership | 150 (to be raised to 300 within first three years) | 100 (to raised to 200 within first three years) |
| Initial share capital | Rs. 1,000 (face value of each share to be of Rs. 5) | Rs. 500 (face value of each share to be of Rs. 5) |
| Loaning programme to be achieved within 1st 3 years. | Rs. 50,000 | Rs. 25,ooo |

**Note :**

i) A list of Backward Class persons joining the proposed society should be got certifed from the Social Welfare Department or Special Executive Magistrate.

ii) In no case the area of operation of the society should exceed the periphery of the city or town concerned. Secondly, where there is more than one society of such type, care should be taken to see that the area of operation of each such society does not overlap.

**4) Salary Earners' Societies :**

Such societies are meant for employees of Government establishments, employees of the Semi-Government bodies, Banks corporations like the Life Insurance Corporation, State Transport Corporation, State Trading Corporation, Universities, Colleges, Schools, Factories, Mills, Industrial establishments etc.

**5) Salary Earners' Societies of the State Government and Zilla Parishad Employees :**

Area of Operation - There is no objection to have separate societies for Class III and Class IV employees of the Government servants or the Zilla Parishad employees provided organisation of such separate societies is found to be economically viable. It is believed that all the area has been covered by the societies of Z. P. Primary Teachers at present. If there is, however, good scope and absolute necessity for organisation of a new society for primary teachers, the same may be considered for registration on merits only. The existing society should not be allowed to be split up on the basis of these norms.

The area of operation of such societies should as far as possible be confined to a district. However, if the number of employees in a district of a given Department is not adequate from the economic point of view to form a society larger area of operation may be allowed or a Salary Earners Society of two or three Departmental Employees may be organised. But the larger area of operation may at the most of most be restricted to the respective Revenue Division and not beyond that no society should as far as possible be registered with entire State as its area of operation. since in societies with such large area of operation, it would be difficult to run the society from recovery and management point of view.

**6)** As a general policy to be followed as a rule, the area of operation of the Salary Earners' Societies of Government Employees and the Zilla Parishad Employees should be confined to a district as stated earlier. However in exceptional cases such a society may be registered for a part of a district if the circumstances so demand and justify, provided the norms regarding initial membership, initial share capital and loaning programme to be achieved within first three years as prescribed in the annexure of this Circular, are fulfilled.

**7) Salary Earners' Societies of Semi-Government Bodies like Municipalities, Banking Companies, Corporations etc.**

In respect of these establishments also there is no objection to have separate societies for supervisory and clerical staff and Class IV employees as also for the teachers of the Municipal Schools, having due regard to the economic viability of the society to be registered. Separate societies for different Departments or Sections of the Semi-Government Body and big Corporations like Life Insurance Corporation working in the city may also be registered, if nece-salary giving due consideration to the aspect of economic viability.

**8) Area of operation :**

In the case of societies of employees of Municipal Corporation, Municipality, Life Insurance Corporation, etc. The area of operation of the society to be registered should be restricted to given Departments of Offices of the Municipal Corporation, Municipality or other concerned Corporation working in particular city.

**9)** In respect of societies of other institutions like a banking company also, this criteria should be followed provided the number of employees in a given city is quite large. But in case the number of Offices or Branches of the employer institution are spread over in a district, then in the case of societies of employees of such institution, there is no objection to have a part of a district or the entire distict as its area of operation. In exceptional cases, there is even no objection to permit the Revenue Division as the area of operation of such a society if it is found necessary to do for achieving economic viability.

**10) Salary Earners' Societies for employees of Universities, Schools and Colleges — Area of operation :**

Each college or a School should constitute as far as possible to be the area of operation of a society falling under this category, provided the number of employees thereof are sufficient enough to form a society from the economic viability view point. Otherwise, the employees of more than one College or a School (as the case may be) situated in a city or town may come together and form a society. As regards the organisation of Salary Earners' Society for the staff of a University, each university premises would constitute the area of operation of such society.

**11) Salary Earners' Societies for Mill hands and Factory Workers- Area of operation :**

These societies may also be organised on a unit basis, i.e. each factory or a mill will have a society for its own employees and workers.

**12)** These economic viability in respect of such societies should be assessed in each individual case, taking into consideration the abailability of premises, furniture and fixtures and other services from the employer, either free of cast or at a concesslional cost.

**13) Salary Earners' Societies for small industrial and commercial establishment :**

There are various such establishments in the state and it is quite necessary to have an agency for provision of a line of credit to their employees, Salary Earners' societies for such establishment should, therefore be encourage.

**14) Area of Operation :**

These societies should also be organised on a unit basis. However. from the economic viability point of view, if the employees of one small commercial industrial establishment are not sufficient to form a society 2 or 3 such establishment within a radius of say 2 Kms. may be clubbed for the purpose of organising such a society.

**15)** As regards the norms regarding initial membership, share capital and a loaning programme to be achieved within first three years by each type of society referred to above, the same are given in the annexure of this Circular.

**16)** In all kinds of Salary Earners' Societies if should be ensured that a certificate from the employer agreeing to deduct the dues of the society as per section 49 of the Maharashtra Co-operavive Societies Act, 1960 is obtained and produced to the Registering Authority along with the registration proposal. Secondly, as stated earlier in para. 2(i) above, it should also be ensured that the bye-laws of the Salary Earners' Societies do not provide for acceptance of deposits from non-members (Public).

**17)** All the concerned registering authorities are requested to study these norms carefully and adhere to the same scrupulously while registering new urban credit and salary earners' societies in their respective jurisdication in future.

Finally it should be born in mind by all the District Deputy Registrars, Taluka Deputy Registrars and the Taluka Assistant Registrars that these norms being applicable to formation of new societies only, the existing urban credit societies or salary Earners Societies should not be allowed to be split-up on the basis of these norms. The existing societies should continue to function with their existing membership and area of operation unless there is an occasion for their splitting up for very special reasons.

Annesxre to the Policy Circular No. URB. 64 / Registration / E-1/81, dated 30th December 1981 from the Office of the Commissioner for Co-operation and Registrar, Co-operative Societies, Maharashtra State, Poona regarding the norms for organisation of Salary Earners' Societies of different types.

| Sr. No. | Initial membership | Type of Salary Earners' Society | Initial Share Capital | Loaning programme to be achieved within first three years |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1) | Salary Earners' Society of the State Government and Zilla Parishad, Class III employees (Applicable also for a society of Primary Teachers) | 300 | 25,000 | 3.00 Lakhs |
| 2) | Salary Earners' Society of the State Government and Zilla Parishad, Class IV Employees. | 100 | 10,000 | 1.00 Lakhs |
| 3) | Salary Earners' Society of the employees of Semi-Government bodies like Municipalities Banking Companies, Corporation etc. | 300 | 25,000 | 3.00 Lakhs |
| 4) | Salary Earners' Society for the employees of a University. | 200 | 25,000 | 3.00 Lakhs |
| 5) | Salary Earners'Society for the Employees of Schools and Colleges. | 50 | 5,000 | 25,000 |
| 6) | Salary Earners' Society for employees and workers of a mill/Fatory. | 50 | 5,000 | 25,000 |
| 7) | Salary Earners, Society for the employees of small Industrial and commercial establishment. | 50 | 5,000 | 25,000 |

**2) Norms Regarding Loans and Advances by Salary Earners' Societies**

## पगारदार नोकरांच्या सहकारी सोसायट्यांनी सभासदांना द्यावयाच्या कर्जासंबंधी असलेल्या पोटनियमातील दुरुस्तीबाबत

(सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे १, यांचे परिपत्रक क्र. बीएनके.-१३२/२ (फिन), दिनांक २१ जानेवारी १९७१)

संदर्भ : १) या कार्यालयाकडील परिपत्रक नं. बीएनके/१३२-२ (फिन), दिनांक ६ डिसेंबर १९७६.

२) शुद्धीपरिपत्रक नं. बीएनके/१३२-२ (फिन), दिनांक २७ फेब्रुवारी १९६८.

३) शुद्धीपरिपत्रक नं. बीएनके/१३२-२ (फिन), दिनांक १८ एप्रिल १९६८.

४) शुद्धीपरिपत्रक नं. बीएनके/१३२-२ (फिन), दिनांक ४ नोव्हेंबर १९६९.

दिनांक ६ डिसेंबर १९६७ रोजी या कार्यालयाने परिपत्रक काढून पगारदार नोकरांच्या सहकारी सोसायट्यांकडून आपले सभासदांना देण्यात येणाऱ्या कर्जाचे प्रमाण, प्रकार, कर्जफेडीची मुदत, जामिनकीची रक्कम,मासिक वर्गणी गोळा करणे वगैरेबाबत सूचना दिल्या होत्या. या नियमाबाबत वेळोवेळी पतपेढ्यांना ज्या काही अडचणी आल्या व ज्या या कार्यालयाचे निदर्शनास आणून दिल्या त्यांचा काळजीपूर्वक विचार करुन वरील पत्रकात वर दर्शविल्याप्रमाणे वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत.

मध्यंतरी अहमदनगर येथील पतपेढ्यांनी वरील परिपत्रकाबाबत "अद्यापही अडचणी आहेत व त्या दुरुस्त करणे आवश्यक आहे" अशा तऱ्हेचे एक निवेदन दिले होते. वरील निवेदनातील सर्व मुद्यांचा पूर्ण विचार केल्यानंतर असे दिसून आले की, याबाबत आतापर्यंत दिलेले आदेश रद्द करुन नवीन सुसूत्र असे आदेश देणे इष्ट ठरेल. त्यानुसार आतापर्यंतचे आदेश रद्द समजून पगारदार सहकारी संस्थांनी कर्ज देण्याचे बाबतीत खालीलप्रमाणे धोरण ठेवावे.

पोट-नियमात इतरत्र काही नमूद केलेले असले तरी सोसायटीने सभासदास द्यावयाच्या कर्जाची मर्यादा खाली नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असता कामा नये :

## तक्ता 'अ'
## कर्ज देण्याबाबतच्या मर्यादा

| कर्जाचा प्रकार | सभासदाच्या फक्त महागाई भत्त्यावरुन मासिक पगारांवरुन ठरविलेली कर्जाची पात्रता | कर्ज पात्रतेच्या संदर्भात किती कर्ज देता येईल त्याची मर्यादा | कर्जाची कमाल मर्यादा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) सर्वसाधारण कर्ज | मासिक पगार व महागाई भत्त्याचे ३० टक्के | पात्रतेच्या ३० पट | रु. ५,०००, सदर कर्ज ३० मासिक हप्त्याने परत करावे. पण विशिष्ट परिस्थितीत व्यवस्थापक समिती वरील मुदत ३६ हप्त्यांपर्यंत वाढवू शकेल. | |
| २) आकस्मिक कर्ज | मासिक पगार व महागाई भत्त्याचे ५ टक्के. | पात्रतेच्या ६ पट. | सदर कर्ज जास्तीत जास्त ८ मासिक हप्त्याने परत करावे. | |

## तक्ता 'ब'
## सभासदाकडून मासिक वर्गणी गोळा करण्याबाबत

| तपशील | मर्यादा |
|---|---|
| १) प्रत्येक कर्ज घेणाऱ्या सभासदांने पोट-नियमात नमूद केलेल्या दराने संस्थेच्या भागभांडवलास मासिक वर्गणी दिली पाहिजे. | रु. ५०० |
| २) भाग भांडवल वर्गणी वर दर्शविल्या मर्यादेपर्यंत पोहचल्यावर त्यानंतरची वर्गणी खाली जमा करावी. | रु. ५०० |
| ३) वरील दोन्ही मर्यादा पूर्ण झाल्यावर जमा होणारी वर्गणी सभासदाच्या बचत खात्यात जमा करावी. अशी जमा झालेली रक्कम सभासदास आपले जरुरीसाठी सोसायटीने या बाबतीत जर काही नियम केले असतील तर त्याप्रमाणे काढून घेता येईल. | कमाल मर्यादा नाही |

टिप्पणी १ : सभासदाने पूर्वीच्या कर्जाची परतफेड कमीत कमी ५० टक्के केल्याशिवाय नवीन कर्ज देण्यास पात्र धरु नये.

टिप्पणी २ : एक सभासद जेव्हा दुसऱ्या सभासदास कर्ज घेण्यासाठी जामिन राहतो त्यावेळी त्या सभासदाची तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या कोष्टकानुसार ठरविण्यात येणारी व्यक्तिगत जी कर्ज मर्यादा ठरली असेल तितकीच मर्यादा जामिनकी मर्यादा, म्हणून धरण्यात यावी. एक सभासद जास्तीत जास्त तीन सभासदांना वरील मर्यादेपर्यंत जामिन राहू शकेल.

टिप्पणी ३ : वरील सूचना सर्व पगारदार नोकरांच्या सहकारी पतपेढ्यांच्या नजरेस आणून त्यांना वरीलप्रमाणे त्यांचे पोट-नियमात दुरुस्त्या करुन घेण्यास प्रवृत्त करावे. परंतु कोठल्याही परिस्थितीत वरीलप्रमाणेच पोट-नियम दुरुस्ती करण्याची कायद्यानुसार त्यांचेवर सक्ती करु नये.

## पगारदार नोकरांच्या सोसायट्यांनी द्यावयाची कर्जे

(सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांचे परिपत्रक क्र. III/१४/यूआरबी-१, सन १९७९, दिनांक १२ एप्रिल १९७९)

या कार्यालयाच्या वरील विषयासंबंधीच्या क्र. बीएनके-१३२-२ (फिन), दिनांक २१ जानेवारी १९७१ च्या परिपत्रकातील तरतुदींचा पुनर्विचार होऊन त्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात येत आहे. :

१) सदर परिपत्रकातील तक्ता 'अ' च्या रकाना ४ मध्ये "रुपये ५,०००" ऐवजी " रुपये १०,०००" असे वाचावे व कर्जफेडीचे जास्तीत जास्त मासिक हप्ते ३० ऐवजी ३६ असावेत.

२) कर्जफेडीच्या मासिक हप्त्याची रक्कम "पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट" च्या तरतुदीस धरुन असली पाहिजे म्हणजेच त्या कायद्यान्वये जी जास्तीत जास्त रक्कम पगारातून कापण्यास हरकत नाही. त्यापेक्षा जास्त रक्कम कापली न जाईल याची दक्षता घेऊन कर्ज परतफेडीचे हप्ते ठरवून दिले पाहिजेत. त्याचप्रमाणे कर्ज मंजुरीची रक्कमही संबंधित कर्जदार सभासदाच्या कर्ज परतफेडीच्या कुवतीनुसारच असावी. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे तिचा संबंध, पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टच्या तरतुदी लक्षात घेता कर्जदार सभासदाच्या दरमहा पगारातून कापता येऊ शकणारी कमाल रक्कम व कर्ज परतफेडीचे कमाल हप्ते यांच्याशी जोडला गेला पाहिजे.

२) तरी सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या परिपत्रकातील तरतुदी जिल्ह्यातील सर्व पगारदार नोकरांच्या सहकारी संस्थांच्या निदर्शनास आणाव्यात व त्यानुसार जरुर ती पोट-नियम दुरुस्ती करण्यास सदर सोसायट्यांना प्रवृत्त करावे. मात्र कोणत्याही परिस्थितीत पोट-नियम दुरुस्तीची सक्ती करु नये.

## पगारदार नोकरांच्या सोसायट्यांनी द्यावयाची कर्जे

(सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांचे परिपत्रक क्रमांक ४/यूआरबी/१/३३०/८०, दिनांक ११नोव्हेंबर १९८०)

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक. क्रमांक बीएनके-१३२-२ (फिन), दिनांक २१ जानेवारी १९७१.

वरील विषयासंबंधीच्या या कार्यालयाच्या क्रमांक III/ यूआरबी-१, सन १९७९ दिनांक १२ एप्रिल १९७९ च्या परिपत्रकातील तरतुदींचा पुनर्विचार होऊन त्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात येत आहे.

१) ज्या सहकारी पतपुरवठा संस्था कुठल्याही कर्ज देणाऱ्या संस्थेकडून कर्ज उचलत नसतील अशा संस्थांच्या बाबतीत कर्जाची मर्यादा रु. १०,००० ऐवजी रु. २०,००० पर्यंत ठरविण्यात यावी.

२) ज्या सहकारी पतपुरवठा संस्था, पतपुरवठा करणाऱ्या संस्थांकडून कर्ज उचलत असतील अशा संस्थांच्या बाबतीत या कार्यालयाच्या वरील दिनांक १२ सप्टेंबर १९७९ च्या परिपत्रकान्वये ठरविल्यानुसार रु. १०,००० हीच कर्ज मर्यादा चालू रहावी.

३) कर्ज परतफेडीच्या मर्यादा क्रमांक १ मधील दाखविलेल्या संस्थांच्या बाबतीत ३६ महिन्याऐवजी ६० महिन्यांपर्यंत वाढविण्यात यावी आणि क्रमांक २ मधील दाखविलेल्या संस्थांच्या बाबतीत सध्या चालू असलेली ३६ महिन्यांची मर्यादाच पुढे चालू रहावी.

तरी सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, यांना विनंती करण्यात येते की, त्यांना या परिपत्रकातील तरतुदी जिल्ह्यातील सर्व पगारदार नोकरांच्या सहकारी संस्थांच्या निदर्शनास आणाव्यात व त्यानुसार जरुर ती पोट-नियम दुरुस्ती करण्यास सदर संस्थांना प्रवृत्त करावे, मात्र कोणत्याही परिस्थितीत पोट-नियम दुरुस्तीची सक्ती करु नये.

## 3) Recovery of Loans of Salary Earners' Societies

### Recoveries of Salary Earners' Societies under section 49 of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960

(Cirular No. FIN/SES/3573/1078, dated 6th April 1973, from the

Commissioner for Co-operation and Registrar, Co-operative Societies Maharashtra State, Pune)

It has been brought to the notice of this office by many salary earners' societies especially co–operative Credit Societies in factories in Bombay, that factory managements in many cases do not pass on the amount deducted from the wages of their workers as dues of co-operative Credit Societies to the respective societies immediately. The default the payments of the societies for a long time.

In this connection, attention of all the employers whose employees have organised credit societies in general and in Greater Bombay area in particular is invited to the provisions of section 49(2) of the Maharashtra Co-operative Societies Act where under

the employer shall, if so required by the society by a requisition in writing, make the deduction in accordance with the agreement executed by a member in favour of the society and shall pay the amount so deducted to the society as if it were a part of the wages payable by him as required under the payment of wages Act, 1936 on the day on which he makes the payment sub-section 3 of section 49 further provides that if the employer fails to deduct the amount intimated by the society or makes default in remitting the amount dedected to the society as indicated above he shall be personally liable for the payment thereof, and the amount shall be recoverable on behalf of the society from him as arrears of Land revenue and the amount so due shall rank in priority in respect of such liability of the employer as wages in arrears. Failure on the part of the employers to comply with section 49(2) is an offence under section 146(6) of the Act liable to punishment under section 147(b) of the Maharashtra co-operative societies Act, 1960 with imprisonment for a term which may extend to one month, or with fine which may extend to Rs. 5,000 or with both.

All the employers are, therefore, requested to take a note of the above provisions of the Act.

## 4) Guidelines Regarding Deciding Proposals Falling UnderSection 66(2) of The M. C. S. Act

**Norms for deciding proposals of Urban Credit and Salary Earners' Societies regarding contribution to Reserve Fund at reduced rate**

(Circular No. III-14-URB-1 of 1979, dated the 7th April 1979, from the Commissioner for Co-operation and Registrar, Co-operative Societies, Maharashtra State, Pune 411 001)

The section 66(2) of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 provides that having regard to the financial position of any Society or Class of Societies, the Registrar may fix the contribution to be made to the reserve fund at a rate lower than 25 per cent of net profit but not lower than one-tenth of the net profits of the society or societies concerned.

2) In recent years number of proposals are received every year by the District Deputy Registrars from Urban Credit and Salary Earners' Societies under the aforesaid section of the Act and the District Deputy Registrars find it difficult to take a decision, particularly because at present there are no norms fixed for deciding such proposals. The Divisional Joint Registrar, C. S., Bombay had, therefore, requested this office to give suitable guidelines to deal with such proposals. The question has accordingly been examined by this office in detail and following norms are prescribed for guidance of all the District Deputy Registrars and Divisional Joint Registrars, Co-operative Societies :

1) The Urban Credit or the Salary Earners' Society requesting for the concession should be in "A" or "B" audit class.

2) The percentage of its overdues to total loans outstanding should not be more than 10%

3) The Societies fulfilling the above 2 conditions and applying for relaxation may be permitted to contribute to the reserve fund at the rates shown in the following table :

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Present level of Reserve Fund to share capital equal to or less than | 10% | 11% | 12% | 13% | 14% | 15% | 16% | 17% | 18% |
| Contribution to be made to the Reserve Fund as percentage to net profit. | 25% | 24% | 23% | 22% | 21% | 20% | 19% | 18% | 17% |
| Present level of Reserve Fund to share capita equal to or less than | 19% | 20% | 21% | 22% | 23% | 24% | 25% | | |
| Contribution to be made to the Reserve Fund as percentage to the net profit. | 16% | 15% | 14% | 13% | 12% | 11% | 10% | | |

4) The Societies requesting for the reduced rate of contribution to theReserve Fund should not be permitted to declare divident at not more than 6 fund at reduced rate is applied for.

3) The District Deputy Registrars / Divisional Joint Registrars are requested to note these guidelines carefully and decide the proposals recieved by them from the Salary Earners' and Urban Credit Societies cordingly.

❑❑❑

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग
शासन परिपत्रक क्र. सीसीआर१२९२/प्र. क्र. २२८/७-सी,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ३२,
दिनांक ८ जुलै १९९३

## परिपत्रक

### सहकारी पतपेढ्यांच्या नोंदणी व कार्यक्षेत्र वाढीच्या निकषांचे सुसूत्रिकरण व पुनर्मुल्यांकन

१) सहकारी चळवळीत, प्राथमिक सहकारी पतपेढी व प्राथमिक विविध कार्यकारी संस्थांचे महत्त्व अनन्य साधारण आहे. या संस्था शेती आणि बिगरशेतीचे कर्ज गरजु सभासदांना देवून त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी मदत करीत आहेत. उक्त संस्थांच्या प्रस्थापनेमुळे शेतकरी आणि इतर सभासदांची सावकारांच्या विळख्यातून सुटका झाली आहे.

२) शासनाने अशा संस्थांची नोंदणी करण्याच्या सूचना सभासदांचे सर्वसाधारण हित लक्षात घेवून क्षेत्रीय अधिकाऱ्यांना वेळोवेळी दिलेल्या आहेत. त्याचवेळी संस्था नोंदणीचे निकषसुद्धा निश्चित केले आहेत. या संस्था अल्प कालावधीत नावारुपास येवून सभासदांचा ओढा अशाप्रकारच्या जास्तीत जास्त संस्था नोंदणी करण्याकडे वाढत गेला आहे. शासनाच्या पातळीवर सुद्धा लोकप्रतिनिधीद्वारे अशा संस्था नोंदणीसाठी सातत्याने मागणी वाढल्यामुळे शासनाने अशा संस्थांची नोंदणी करण्याबाबत सहकार आयुक्त व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना वेळोवेळी सूचना दिल्या आहेत.

३) शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी दिनांक २९-८-१९९२ व दि. १५-८-१९९३ रोजी याबाबत परिपत्रकाद्वारे अशा संस्थांच्या नोंदणीबाबत काही मार्गदर्शनपर सूचना काढल्या आहेत व पूर्वीच्या निकषांत काही फेरबदल केले आहेत.

४) शासनानेही दिनांक १६-२-१९९३ रोजी सहकारी पतसंस्थेच्या कार्यक्षेत्रवाढीचे निकष निश्चित केले असून ते सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कळविले आहेत.

५) सहकार आयुक्त व शासन यांनी काढलेल्या या परिपत्रकांमुळे संस्थांच्या नोंदणीमध्ये क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मनात गोंधळ निर्माण होण्याची व त्यामुळे पर्यायाने संस्था नोंदणीस अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या सर्व बाबींचा सर्वकष विचार करुन व पतसंस्थांच्या नोंदणी नियमात सुसूत्रता आणण्यासाठी या पूर्वीची सर्व परिपत्रके रद्द करुन खालील सुधारीत सूचना शासन देत आहे.

| अ. क्र. | नागरी विभागाचा प्रकार | कार्यक्षेत्र | लोकसंख्या | प्राथमिक सदस्य संख्या | भाग भांडवल | तीन वर्षात उभारावयाचे भाग भांडवल रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १) | बृहन्मुंबई, पुणे, नागपूर | एक वॉर्ड | ५,००० | ४०० | २०,००० | ३.०० लाख |
| २) | महानगरपालिका असलेली शहरे | एक वॉर्ड | ५,००० | ३०० | १५,००० | २.५० लाख |
| ३) | नगरपालिका असलेली शहरे | एक ते दोन वॉर्ड | ४,००० | २५० | १०,००० | २.०० लाख |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४) | अन्य नागरी व अर्धनागरी/ग्रामीण | एक गाव | २,५०० | २०० | १०,००० | १.५० लाख |
| ५) | महिला व दुर्बल घटकांसाठी | वॉर्ड | ४,००० | २०० | १०,००० | २,०० लाख |
| | | गाव | २,५०० | १०० | ०८,००० | १.०० लाख |

६) निरनिराळ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्ति, मंत्री/खासदार, आमदार व लोकप्रतिनिधींकडून ज्या वेळेस सहकारी पतसंस्था नोंदणीसाठी विनंती करण्यात येते तेव्हा स्थानिक गरज लक्षात घेवून शासनाकडून पतसंस्था नोंदणी करण्याचे आदेश दिले जातात. अशाप्रसंगी नोंदणी अधिकाऱ्यांनी असे प्रस्ताव गुणवत्तेवर तपासून नोंदणी करावेत तथापि जेव्हा गुणवत्ता व आर्थिक निकषांच्या कसोट्यावर असे प्रस्ताव नोंदणी करता येत नाहीत तेव्हा नोंदणीसाठी काही अटी शिथिल करणे आवश्यक असल्यास तसा प्रस्ताव आपल्या शिफारशींसह शासनाकडे तात्काळ पाठवावा व पुढील आदेश घेण्याची कार्यवाही करावी. असे प्रस्ताव पाठविताना सहकार आयुक्त व विभागीय सहनिबंधक/जिल्हा उप निबंधक यांनी शासनास आवश्यक ती सर्व माहिती प्रस्तावासोबत द्यावी.

नियोजित संस्थेची नोंदणी करण्यापूर्वी नियोजित संस्थेच्या कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या पतसंस्थांना सुनावणी देवून त्यांचे ऐकून गुणवत्तेनुसार संबंधीत अधिकाऱ्याने नोंदणी करावी.

७) **कार्यक्षेत्र वाढीबाबत :**

नोंदणी झालेल्या पतसंस्थांचे कार्यक्षेत्रवाढीचे प्रस्ताव सुद्धा सातत्याने निरनिराळ्या स्तरावरील कार्यालयांकडे व शासनाकडे येत असतात. त्यासाठी सुद्धा खालीलप्रमाणे निकष असावेत असे शासनाने आता निश्चित केले आहे.

**अ) बृहन्मुंबई कार्यक्षेत्रासाठी :**

१) मागील ५ वर्षे संस्थेचा लेखापरिक्षण वर्ग सातत्याने "अ" असावा.

२) संस्थेचे वसूल भागभांडवल १० लाख व गंगाजळी २ लाख असावी.

३) संस्थेचे थकबाकीचे प्रमाण १० टक्केपेक्षा जास्त नसावे.

४) संस्थेने सभासदांना ठेवीतून कर्ज दिलेले असावे. तथापि बँकेकडून कर्ज उभारणे असल्यास सदर कर्जाची रक्कम ठेवीच्या १५ टक्केपेक्षा जास्त नसावी.

५) संस्था नफ्यात असावी व किमान ठेवी २० लाख असाव्यात.

६) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयीत कर्ज निधी उभारलेला असावा.

७) सहकार खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श पोटनियम संस्थेने स्विकारलेले असावेत.

८) संस्थेने शाखा उघडण्यास परवानगी मागितल्यास अशा शाखेकडे वर्ग करावयाच्या ठेवीची रक्कम रुपये ७.५० लाख व किमान सभासद संख्या ७५० असावी.

९) फळे, फुले, भाजीपाला मार्केट इत्यादीचे स्थलांतर झाल्यावर कार्यक्षेत्र वाढीबाबतचे येणारे सर्व प्रस्तावावर गुणवत्तेवर नोंदणी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा.

**ब) इतर जिल्ह्यातील पतसंस्था :**

**१) तालुका कार्यक्षेत्रासाठी :**

१) मागील ३ वर्षे संस्थेचा लेखा परीक्षण वर्ग सातत्याने "अ" असावा.

२) संस्थेचे किमान वसूल भागभांडवल रुपये ५ लाख असावे. गंगाजळी रुपये एक लाख असावी.

३) सभासदांना देण्यात येणारी कर्जे शक्यतो ठेवीतून दिलेली असावीत व जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज उभारले असेल तर सदर कर्जाची रक्कम एकूण ठेवीच्या २० टक्केपेक्षा अधिक नसावी.

४) संस्था नफ्यात असावी व संस्थेने किमान १० लाखापर्यंत ठेवी गोळा केलेल्या असाव्यात.

५) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयीत कर्ज निधी उभारलेला असावा.

६) संस्थेच्या थकबाकीचे प्रमाण १० टक्केपेक्षा जास्त नसावे.

७) खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श पोटनियम संस्थेने स्विकारलेले असावेत.

८) संस्थेला शाखा उघडावयाची परवानगी द्यावयाची असल्यास अशा शाखेकडे वर्ग करावयाच्या ठेवींची रक्कम रुपये ५ लाख व सभासद संख्या किमान ५०० असावी.

२) जिल्हा कार्यक्षेत्रासाठी :

१) मागील ५ वर्षे संस्थेचा लेखा परीक्षण वर्ग सातत्याने "अ" असावा.

२) संस्थेचे वसूल भागभांडवल किमान रुपये १० लाख आणि गंगाजळी रु. २ लाख असावेत.

३) सभासदांना देण्यात येणारी कर्जे शक्यतो संस्थेने ठेवी उभारुन दिलेली असावीत व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून कर्ज उभारले असेल तर सदर कर्जाची रक्कम एकूण ठेवीच्या रकमेच्या १५ टक्केपेक्षा अधिक नसावी.

४) संस्था नफ्यात असावी व किमान २० लाखापर्यंत ठेवी गोळा केलेल्या असाव्यात.

५) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयित कर्ज निधी उभारलेला असावा.

६) संस्थेच्या थकबाकीचे प्रमाण १०% पेक्षा अधिक नसावे.

७) खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श पोटनियम संस्थेने स्विकारलेले असावेत.

८) संस्थेने शाखा उघडण्यासाठी परवानगी मागितल्यास अशा शाखेकडे संस्थेने किमान रुपये ७.५० लाख ठेवी वर्ग करणे आवश्यक आहे. किमान सभासद संख्या ७५० ची असावी.

**क) तालुका/शहर/जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या नागरी पतसंस्थांनी बृहन्मुंबई वार्डात शाखा उघडणेबाबत.**

राज्यातील मुंबई बाहेरील जिल्ह्यात कार्यरत असलेल्या नागरी पतसंस्थांतील सभासद नोकरी धंद्यानिमित्त, रोजगारासाठी मुंबई शहरात येतात व मुंबई शहरातच स्थाईक होतात. ग्रामीण व निमग्रामीण भागातून आलेल्या अशा व्यक्तिंना त्यांचे मुळ नागरी पतसंस्थेकडून कर्जाची सोय उपलब्ध झाल्यास मुंबईसारख्या मोठ्या शहरात त्यांना मोठ्या कर्जाच्या गरजेसाठी बँका अगर सावकारांचे दार ठोठावण्याची वेळ येणार नाही. याकरिता मुंबई शहरातील एक अगर दोन वार्डपुरते कार्यक्षेत्र मुंबई बाहेरील पतसंस्थेस तालुका कार्यक्षेत्राखाली ज्या अटी दिल्या आहेत त्या अटीस अधिन राहून कार्यक्षेत्रवाढ देणेस अनुमती देण्यात येत आहे.

पतसंस्थांच्या कार्यक्षेत्रात वाढ देताना कार्यक्षेत्रातील पतसंस्थांचे आर्थिक सक्षमतेचा विचार करुन गुणवत्तेवर निर्णय घ्यावा. अस्तित्वात असलेल्या संस्थेस सुनावणीही देणे आवश्यक राहील.

सहकारी पतसंस्थांचे नोंदणीबाबत यापूर्वी दिनांक ४ ऑगस्ट १९८६, २८-१२-१९९०, १७-७-१९९१, २९-८-१९९२ व शासनाचे दिनांक १६-२-१९९३ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

सही/-
श्रीमती वै. ल. घोडके
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग

# सहकारी पतपेढ्यांच्या नोंदणी व कार्यक्षेत्र वाढीच्या निकषांचे सुसूत्रीकरण.

## महाराष्ट्र शासन

सहकार व वस्त्रोद्योग विभाग,

शासन परिपत्रक क्र. सीसीआर- १२९६/ प्र. क्र. ४७५/७ सी

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२

**दिनांक २७ मार्च, १९९७**

## परिपत्रक

१) सहकारी चळवळीत, नागरी सहकारी पतसंस्था व प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. या संस्था अनुक्रमे बिगरशेती व शेतीचे कर्ज गरजू सभासदांना देऊन त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी मदत करीत आहेत. उक्त संस्थांच्या प्रस्थापनेमुळे नागरी भागातील या संस्थांच्या सभासदांची सावकाराच्या विळख्यातून सुटका झाली आहे.

२) शासनाने सभासदांचे सर्वसाधारण हीत लक्षात घेऊन नागरी सहकारी पतसंस्थांची नोंदणी करण्याच्या सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना वेळोवेळी दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे संस्था नोंदणीचे निकषसुद्धा निश्चित केले आहेत. या संस्था अल्प कालावधीत नावारुपास येऊन सभासदांचा ओढा अशाप्रकारच्या जास्तीत जास्त संस्था नोंदणी करण्याकडे वाढत गेला आहे. शासनाच्या पातळीवर सुद्धा लोकप्रतिनिधीद्वारे अशा संस्था नोंदणीसाठी सातत्याने मागणी वाढल्यामुळे शासनाने अशा संस्थांची नोंदणी करण्याबाबत सहकार आयुक्त व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वेळोवेळी सूचना दिल्या आहेत.

३) शासनाने नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणीबाबत व कार्यक्षेत्रवाढीबाबत निकष क्रमांक सीसीआर-१२९२ / प्र. क्र. २२८/७ - सी, दिनांक ८ जुलै १९९३ च्या परिपत्रकान्वये निश्चित केले असून ते सर्व अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहेत.

४) शासनाच्या दिनांक ८ जुलै १९९३ च्या परिपत्रकातील नोंदणीच्या व कार्यक्षेत्रवाढीच्या निकषांमुळे अनेक जिल्ह्यात नवीन नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणीस व कार्यक्षेत्र वाढीस वाव राहिलेला नाही असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. नागरी भागातील जनतेच्या वाढत्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन हे निकष काही प्रमाणात शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आता शासनाने नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणीबाबत तसेच कार्यक्षेत्रवाढीबाबत सद्याचे निकष काही प्रमाणात शिथिल करण्याचा निर्णय घेतला असून सुधारित निकष खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | नागरी विभागाचा प्रकार | कार्यक्षेत्र | लोक संख्या | प्राथमिक सदस्य संख्या | भाग भांडवल रुपये | तीन वर्षात उभारावयाचे भाग भांडवल रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १) | बृहन्मुंबई, पुणे, नागपूर | एक वॉर्ड | ४,००० | ३०० | २०,००० | ३.०० लाख |
| २) | महानगरपालिका असलेली शहरे | एक वॉर्ड | ३,००० | २५० | १५,००० | २.५० लाख |
| ३) | नगरपालिका असलेली शहरे | एक ते दोन वॉर्डस् | २,५०० | २५० | १०,००० | २.०० लाख |
| ४) | अन्य नागरी व अधि-नागरी / ग्रामीण | एक गाव | २,००० | २०० | १०,००० | १.५० लाख |
| ५) | महिला व दुर्बल | एक वॉर्ड | २,५०० | २०० | १०,००० | २.०० लाख |
| | घटकांसाठी | एक गाव | २,००० | १०० | ८,००० | १.०० लाख |

वरील निकषांची पूर्तता होणाऱ्या नियोजित पतसंस्थाचीच नोंदणी करण्यात यावी. नियोजित संस्था निकषांची पूर्तता करीत नसल्यास अशा संस्थांची नोंदणी नाकारण्यात यावी.

नियोजित संस्थेची नोंदणी करण्यापूर्वी तिच्या कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या पतसंस्थांना सुनावणी देऊन त्यांचे म्हणणे ऐकून गुणवत्तेनुसार संबंधित अधिकाऱ्याने नोंदणी करावी.

५) **कार्यक्षेत्रवाढीबाबत** नोंदणी झालेल्या पतसंस्थांचे कार्यक्षेत्रवाढीचे प्रस्ताव सुद्धा सातत्याने निरनिराळ्या स्तरावरील कार्यालयांकडे व शासनाकडे येत असतात. त्यासाठी सुद्धा खालीलप्रमाणे सुधारित निकष असावेत असे शासनाने आता निश्चित केले आहे.

**अ) बृहन् मुंबई कार्यक्षेत्रासाठी :**

१) मागील ३ वर्षे संस्थेचा लेखापरीक्षण वर्ग सातत्याने "अ" असावा.

२) संस्थेचे वसूल भाग भांडवल ७ लाख व गंगाजळी १.५ लाख असावी.

३) संस्थेचे थकबाकीचे प्रमाण १० टक्के पेक्षा जास्त नसावे.

४) संस्थेने सभासदांना ठेवीतून कर्ज दिलेले असावे. तथापि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज उभारले असल्यास सदर कर्जाची रक्कम ठेवीच्या १५ टक्क्यापेक्षा जास्त नसावी.

५) संस्था नफ्यात असावी व संस्थेचे किमान ठेवी रुपये १५ लाख असाव्यात.

६) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयित कर्ज निधी उभारलेला असावा.

७) सहकार खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श पोटनियम संस्थेने स्विकारलेले असावेत.

८) संस्थेने शाखा उघडण्यास परवानगी मागितल्यास अशा शाखेकडे वर्ग करावयाच्या ठेवीची रक्कम रु. ५.०० लाख व किमान सभासद संख्या ५०० असावी.

९) फळे, फुले, भाजीपाला मार्केट इत्यादींचे स्थलातंर झाल्यावर कार्यक्षेत्र वाढीबाबत येणाऱ्या सर्व प्रस्तावावर गुणवत्तेनुसार नोंदणी अधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावा.

**ब) इतर जिल्ह्यातील पतसंस्था :**

**१) तालुका क्षेत्रासाठी :**

१) मागील २ वर्षे संस्थेचा लेखापरीक्षण वर्ग सातत्याने "अ" असावा.

२) संस्थेचे किमान वसूल भाग भांडवल रु. ४.०० लाख असावे. गंगाजळी रु. १.०० लाख असावी.

३) सभासदांना देण्यात येणारी कर्जे शक्यतो ठेवीतून दिलेली असावी व जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज उभारले असेल तर सदर कर्जाची रक्कम एकूण ठेवीच्या २०% पेक्षा अधि क नसावी.

४) संस्था नफ्यात असावी व संस्थेने किमान रुपये ७.५० लाखापर्यंत ठेवी गोळा केलेल्या असाव्यात.

५) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयित कर्ज निधी उभारलेला असावा.

६) संस्थेच्या थकबाकीचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा जास्त नसावे.

७) खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श पोटनियम संस्थेने स्विकारलेले असावेत.

८) संस्थेला शाखा उघडावयाची परवानगी द्यावयाची असल्यास अशा शाखेकडे वर्ग करावयाच्या ठेवीची रक्कम रु. २.५० लाख सभासद संख्या किमान २५० असावी

**२) जिल्हा कार्यक्षेत्रसाठी :**

१) मागील ३ वर्षे संस्थेचा लेखापरिक्षण वर्ग सातत्याने "अ" असावा.

२) संस्थेचे वसूल भाग भांडवल किमान रु. ७.०० लाख आणि गंगाजळी रु. १.५० लाख असावेत.

३) सभासदांना देण्यात येणारी कर्जे शक्यतो संस्थेने ठेवी उभारुन दिलेली असावी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून कर्ज उभारले असेल तर सदर कर्जाची रक्कम एकूण ठेवीच्या रक्कमेच्या १५ टक्केपेक्षा अधिक नसावी.

४) संस्था नफ्यात असावी व किमान रुपये १५.०० लाखापर्यंत ठेवी गोळा केलेल्या असाव्यात.

५) संस्थने आवश्यक तो बुडीत व संशयित कर्ज निधी उभारलेला असावा.

६) संस्थेच्या थकबाकीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा अधिक नसावे.

७) खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श पोटनियम संस्थेने स्विकारले असावेत.

८) संस्थेने शाखा उघडण्यासाठी परवानगी मागितल्यास अशा शाखेकडे संस्थेने किमान रु. ५ लाख ठेवी वर्ग करणे आवश्यक आहे. किमान सभासद संख्या ५०० असावी.

**क) तालुका / शहर / जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या नागरी पतसंस्थांनी बृहन्मुंबईतील वॉर्डात शाखा उघडणेबाबत :**

राज्यातील मुंबई बाहेरील जिल्ह्यात कार्यरत असलेल्या नागरी पतसंस्थांतील सभासद नोकरी धंद्यानिमित्त व रोजगारासाठी मुंबई शहरात येतात व मुंबई शहरातच स्थायिक होतात. ग्रामीण अधि ग्रामीण भागातून आलेल्या अशा व्यक्तींना त्यांचे मूळ नागरी पतसंस्थेकडून कर्जाची सोय उपलब्ध झाल्यास मुंबईसारख्या मोठ्या शहरात त्यांना मोठ्या कर्जाच्या गरजेसाठी बँका अगर सावकारांचे दार ठोठावण्याची वेळ येणार नाही. याकरीता मुंबई शहारातील एक अगर दोन वॉर्डपुरते कार्यक्षेत्र मुंबई बाहेरील पतसंस्थेस तालुका कार्यक्षेत्राखाली ज्या अटी दिल्या आहेत त्या अटीस अधिन राहून देण्यास अनुमती देण्यात येत आहे.

पतसंस्थांच्या कार्यक्षेत्रास वाढ देताना कार्यक्षेत्रातील पतसंस्थांच्या आर्थिक सक्षमतेचा विचार करुन गुणवत्तेवर निर्णय घ्यावा. अस्तित्वात आलेल्या संस्थेस सुनावणीही देणे आवश्यक राहील.

सहकारी पतसंस्थांचे नोंदणीबाबत यापूर्वी दि. ४ ऑगस्ट, १९८६, २८-१२-१९९०, १७-७-१९९१, २९-८-१९९२ व शासनाचे दिनांक १६-२-१९९३ व ८-७-१९९३ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

सही /-
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.
सहकार व वस्त्रोद्योग विभाग

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

# सहकारी पतपेढ्यांच्या नोंदणी व कार्यक्षेत्रवाढीच्या निकषांचे सुसूत्रीकरण

## महाराष्ट्र शासन

## सहकार व वस्त्रोद्योग विभाग

शासन परिपत्रक क्रमांक सीसीआर-१२९६/प्र. क्र. ४७५/७ -स,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३१ मे, २००१

## परिपत्रक

शासनाने नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणीबाबत व कार्यक्षेत्रवाढीबाबतचे निकष क्रमांक सीसीआर - १२९६ / प्र. क्र. ४७५/ ७-स, दिनांक २७ मार्च, १९९७ च्या परिपत्रकान्वये निश्चित केले असून ते सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहेत.

शासनाच्या दिनांक २७ मार्च, १९९७ च्या परिपत्रकातील नोंदणी व कार्यक्षेत्रवाढीच्या निकषांमुळे काही नवीन नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणी व कार्यक्षेत्रवाढीबाबत कोणतेही स्पष्ट निर्देश नाहीत असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. नागरी भागातील जनतेच्या वाढत्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन हे निकष निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीत होती. आत शासनाने विशिष्ट व्यवसायींच्या नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणीबाबत तसेच कार्यक्षेत्रवाढीबाबत नवीन निकष करण्याचा निर्णय घेतला असून सुधारित निकष खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कार्यक्षेत्र | प्राथमिक सदस्य | सुरुवातीचे भागभांडवल | ३ वर्षात उभारावयाचे भागभांडवल |
|---|---|---|---|---|
| १) | तालुका | ५०० | १.०० लाख | ४.०० लाख |
| २) | जिल्हा | १००० | १.५० लाख | ७.५० लाख |

वरील निकषांची पुर्तता होणाऱ्या नियोजित पतसंस्थांचीची नोंदणी करण्यात यावी. नियोजित संस्था निकषांची पुर्तता करीत नसल्यास अशा संस्थांची नोंदणी नाकारण्यात यावी.

तसेच कार्यक्षेत्रवाढीसाठी शासन परिपत्रक दिनांक २७-३-९७ नुसार तालुका जिल्हा कार्यक्षेत्रवाढ तसेच बृहन्मंबई व राज्यातील इतर पतसंस्थांना मुंबई विभागात एक अथवा दोन वॉर्डाचे कार्यक्षेत्रवाढ करता येते. मात्र शेजारच्या जिल्ह्याचे कार्यक्षेत्र वाढवून घेता येत नाही. म्हणून ज्या संस्थेचे कार्यक्षेत्र जिल्हा आहे अशा संस्थेस शेजारील जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र वाढवायचे झाल्यास त्यासाठी निकष खालीलप्रमाणे

१) मागील ५ वर्षाचा लेखापरिक्षण वर्ग "अ" असावा.

२) वसूल भांगभांडवल रु. २०/- लाख व गंगाजळी रु. ५/- लाख असावी.

३) थकबाकीचे प्रमाण ५% पेक्षा कमी असावे.

४) ठेवीतून कर्जवाटप केलेले असावे.

५) संस्था नफ्यात असावी. किमान ठेवी रु. ५० /- लाख असाव्यात.

६) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयीत कर्ज निधी उभारलेल्या असावा.

७) खात्याने प्रस्तूत केलेले आदर्श उपविधी स्विकारलेले असावेत.

८) शाखा उघडावयास परवानगी द्यावयाची झाल्यास अशा शाखेकडे किमान ५/- लाख ठेवी वर्ग कराव्यात व सभासद संख्या किमान १००० ची यादी जोडावी.

या निकषानुसार प्रस्ताव विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांनी त्यांचे स्तरावर मंजूर करावयाचे आहेत.

ज्या संस्थेचे कार्यक्षेत्र एका विभागाचे आहे, अशा संस्थांनी दुसऱ्या विभागातील कार्यक्षेत्र मागणी केल्यास त्यासाठी निकष खालीलप्रमाणे.

१) मागील १५ वर्षाचा लेखापरिक्षण वर्ग 'अ' असावा.

२) वसूल भागभांडवल ५०/- लाख व गंगाजळी १०/- लाख असावी.

३) थकबाकीचे प्रमाण ५% पेक्षा कमी असावे.

४) ठेवीतून कर्जवाटप केलेले असावे.

५) संस्था नफ्यात असावी किमान ठेवी ५ कोटी असाव्यात.

६) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयीत कर्ज निधी उभारलेला असावा.

७) खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श पोटनियम स्विकारलेले असावेत.

८) शाखा उघडण्यास परवानगी मागीतल्यास अशा शाखेकडे वर्ग करावयाच्या ठेवींची रक्कम रु. १०/- लाख व सभासद संख्या किमान १५०० ची यादी सोबत जोडावी.

या निकषाप्रमाणे प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील.

नियोजित संस्थेची नोंदणी करण्यापूर्वी तिच्या कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या पतसंस्थांना सुनावणी देऊन त्यांचे म्हणणे ऐकून गुणवत्तेनुसार संबंधित अधिकायाने नोंदणी करावी.

पतसंस्थांच्या कार्यक्षेत्रात वाढ देतांना कार्यक्षेत्रातील पतसंस्थांच्या आर्थिक सक्षमतेचा विचार करुन गुणवत्तेवर निर्णय घ्यावा. अस्तित्वात असलेल्या संस्थेत सुनावणीही देणे आवश्यक राहील.

सहकारी पतसंस्थाचे नोंदणीबाबत व कार्यक्षेत्रवाढीबाबत यापूर्वी दिनांक २७-३-१९९७ च्या परिपत्रकान्वये विहीत केलेले इतर निकष तेच राहतील.

सही /-

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन,**

**सहकार व वस्त्रोद्योग विभाग.**

जा.क्र.ना.बँका/डी-४/ना.पत/नोंदणी/कार्यक्षेत्रवाढ/०४
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक : १-७-२००४

प्रति,
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, (सर्व)

## विषय : नागरी सहकारी पतसंस्थाच्या नोंदणी व कार्यक्षेत्रवाढीबाबत...

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२) नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणीबाबत वेळोवेळी शासनाने निकष निश्चित केलेले आहेत. अंतिमतः दिनांक ३१-५-२००१ नुसार नोंदणी, कार्यक्षेत्रवाढ व शाखा विस्ताराबाबत परिपत्रकीय सूचना देण्यात आलेल्या आहेत. सध्याचे परिपत्रकीय सूचनांनुसार राज्यात मोठ्या प्रमाणावर नागरी सहकारी पतसंस्था नोंदविण्यात येत असल्याचे दिसून येत आहे व कालांतराने अशा संस्था बुडीत निघत असल्याचे दिसून आलेले आहे परिणामी ठेवीदारांच्या ठेवीबाबत असुरक्षितता निर्माण झालेली आहे. ही बाब विचारात घेऊन नागरी सहकारी पतसंस्थांचे नोंदणी व कार्यक्षेत्रवाढीच्या निकषांत सुसूत्रता व सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे. या प्रकरणी शासनस्तरावर लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे. सबब आपणांस कळविण्यात येते की, सदर निर्णय होईपर्यंत आपल्याकडे प्राप्त होणाऱ्या नोंदणी / कार्यक्षेत्रवाढीच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येऊ नये.

मा. सहकार आयुक्त
यांचे मान्यतेने

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता...

●●●

सहकारी बँकांवर रिझर्व्ह बँक व मा. निबंधक स. संस्था यांचे (दुहेरी नियंत्रण आहे). मात्र अर्बन क्रेडिट संस्था व इतर संस्थांवर निबंधकांच नियंत्रण आहे.

१) उपलब्ध मा. निबंधक वेळोवेळी दिलेले आदेश यामध्ये दिलेले आहेत.

२) मा. आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे व अद्यावत परिपत्रका अन्वये कामकाज सहकारी संस्थांनी करणेचे नियंत्रण सहकारी खात्याचे आहे.

●●●

जा. क्र. ना. बँका/डी-४/नागरी पत/नों. का. सुधारित निकष/२००४
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक : २१ ऑगस्ट २००४

प्रति,
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
तालुका/सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (सर्व)

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांचे नोंदणी व कार्यक्षेत्र वाढीचे सुधारीत निकष**

**संदर्भ :** १) शासन परिपत्रक क्रमांक सीसीआर/१२९६/प्र. क्र. ४७५/७-सी
दिनांक २७-३-१९९७
२) शासन परिपत्रक क्रमांक सीसीआर-१२९६/प्र. क्र. ४७५/७-स
दिनांक ३१-५-२००१
३) शासन पत्र क्रमांक सीसीआर ११०४/प्र. क्र. १२५/७-स
दिनांक ५-८-२००४

उपरोक्त विषय व संदर्भाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणी व कार्यक्षेत्र वाढी शासनाने परिपत्रक क्रमांक सीसीआर/१२९६/प्र. क्र. ४७५/७-सी दिनांक २७-३-१९९७ व शासन परिपत्रक क्रमांक सीसीआर-१२९६/प्र. क्र. ४७५/७-स दिनांक ३१-५-२००१ पत्रान्वये निकष विहित केलेले होते.

सदर निकष विचारात घेता नोंदविण्यात येणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्थांचा भागभांडवलाचा पाया हा कमकुवत असल्यामुळे संस्था नोंदणीकृत झाल्यानंतर आर्थिक डबघाईस येतात व त्याची झळ ठेवीदारांना सोसावी लागते. अशा परिस्थितीत आर्थिक गुणवत्तेवर आधारित नागरी सहकारी पतसंस्थांची नोंदणी होऊन त्या आर्थिकदृष्ट्या सक्षमरित्या उभ्या राहाव्यात. तसेच त्यांच्या भाग भांडवलाचा पायाही भक्कम असावा इ. बाबी विचारात घेऊन नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणी व कार्यक्षेत्रवाढीच्या प्रचलित निकषात बदल करणे अत्यावश्यक झालेले आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता नागरी सहकारी पतसंस्थांचे नोंदणी व कार्यक्षेत्र वाढीसाठी खालीलप्रमाणे निकष विहीत करण्यात आलेले आहेत. यापुढे नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणी व कार्यक्षेत्र वाढ इ. प्रकरणास मंजुरी देताना खालील निकषांची पूर्तता करणाऱ्या संस्थांच्या प्रकरणावर निर्णय घेण्यात यावा. सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१) पतसंस्था नोंदणी निकष :

नवीन पतसंस्थांच्या नोंदणीचे प्रस्तावासाठी खालीलप्रमाणे सुधारीत निकष विहीत करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | नागरी विभागाचा प्रकार | कार्यक्षेत्र | प्राथमिक सदस्य संख्या | नोंदणी समयी भाग भांडवल रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | बृहन्मुंबई | जिल्हा | २,००० | ५० लाख |
| | पुणे | जिल्हा | २,००० | ३० लाख |
| | नागपूर | जिल्हा | २,००० | ३० लाख |
| | बृहन्मुंबई | एक वॉर्ड/प्रभाग | २,००० | ४० लाख |
| २) | महानगरपालिका असलेली शहरे | एक वॉर्ड/प्रभाग | १,५०० | १० लाख |
| ३) | नगरपालिका असलेली शहरे | एक ते दोन वॉर्ड/प्रभाग | १,००० | ५ लाख |
| ४) | अन्य नागरी व अधि. नागरी/ग्रामीण | एक गाव | ७५० | २ लाख |
| ५) | महिला व दुर्बल घटकांसाठी | एक वॉर्ड/ एक गांव प्रभाग | ५०० | १ लाख |
| ६) | तालुका | तालुका | २,००० | ३ लाख |
| ७) | जिल्हा | जिल्हा | ४,००० | १० लाख |

अ) वरील निकषांची पूर्तता होणाऱ्या नियोजित पतसंस्थांची नोंदणी करण्यात यावी. नियोजित संस्था निकषाची पूर्तता करीत नसल्यास अशा संस्थांची नोंदणी नाकारण्यात यावी.

ब) नियोजित संस्थेची नोंदणी करण्यापूर्वी तिच्या कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या पतसंस्थांना सुनावणी देऊन त्यांचे म्हणणे ऐकून गुणवत्तेनुसार संबंधीत अधिकाऱ्याने नोंदणी करावी.

२) कार्यक्षेत्र वाढीबाबत :

नोंदणी झालेल्या पतसंस्थांचे कार्यक्षेत्रवाढीचे प्रस्तावासाठी खलीलप्रमाणे सुधारीत निकष विहित करण्यात येत आहेत.

अ) बृहन्मुंबई जिल्हा कार्यक्षेत्रासाठी :

१) मागील ५ वर्षे संस्थेचा लेखापरिक्षण वर्ग सातत्याने अ असावा.

२) संस्थेची वसूल भाग भांडवल २ कोटी व गंगाजळी २५ लाख असावी.

३) संस्थेची थकबाकी ५ टक्केपेक्षा कमी असावी.

४) ठेवीतून कर्ज वाटप केलेले असावे.

५) संस्था नफ्यात असावी व किमान ठेवी १० कोटी असाव्या.

६) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयीत कर्ज निधी उभारलेला असावा.

७) सहकार खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श पोटनियम संस्थेने स्विकारलेले असावेत.

८) नवीन शाखा उघडणेचा प्रस्ताव :

संस्थेने शाखा उघडण्यास परवानगी मागितल्यास अशा शाखेकडे वर्ग करावयाच्या ठेवीची रक्कम रु. ५० लाख व किमान सभासद संख्या १००० असावी.

९) फळ, फुले, भाजीपाला मार्केट इ. चे स्थलांतर झाल्यावर कार्यक्षेत्र वाढीबाबत येणाऱ्या सर्व प्रस्तावावर गुणवत्तेनुसार नोंदणी अधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावा.

ब) तालुका कार्यक्षेत्रासाठी :

१) मागील २ वर्षे संस्थेचा लेखापरीक्षण वर्ग सातत्याने अ असावा.

२) संस्थेचे किमान वसूल भाग भांडवल रु. २० लाख असावे. गंगाजळी रु. ५ लाख असावी.

३) संस्थेची थकबाकी ५ टक्केपेक्षा कमी असावी.

४) ठेवीतून कर्ज वाटप केलेले असावे.

५) संस्था नफ्यात असावी व संस्थेकडे किमान ३ कोटी ठेवी जमा असाव्यात.

६) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयीत कर्ज निधी उभारलेला असावा.

७) खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श पोटनियम संस्थेने स्विकारलेले असावेत.

८) नवीन शाखा उघडणेचा प्रस्ताव :

संस्थेने शाखा उघडण्यासाठी परवानगी मागितल्यास अशा शाखेकडे संस्थेने किमान रु. १० लाखाच्या ठेवी वर्ग करणे आवश्यक आहे व किमान सभासद संख्या किमान ५०० असावी.

क) जिल्हा क्षेत्रासाठी :

१) मागील ३ वर्षे संस्थेचा लेखापरीक्षण वर्ग सातत्याने अ असावा.

२) संस्थेचे किमान वसूल भाग भांडवल रु. ५० लाख असावे. गंगाजळी रु. १० लाख असावी.

३) संस्थेची थकबाकी ५ टक्केपेक्षा कमी असावी.

४) ठेवीतून कर्ज वाटप केलेले असावे.

५) संस्था नफ्यात असावी व संस्थेने किमान ५ कोटी ठेवी गोळा केलेल्या असाव्यात.

६) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयीत कर्ज निधी उभारलेला असावा.

७) खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श पोटनियम संस्थेने स्विकारलेले असावेत.

८) नवीन शाखा उघडणेचा प्रस्ताव :

संस्थेने शाखा उघडण्यासाठी परवानगी मागितल्यास अशा शाखेकडे संस्थेने किमान रु. २५ लाखाच्या ठेवी वर्ग करणे आवश्यक आहे व सभासद संख्या किमान ७५० असावी.

ड) विभाग/शेजारील जिल्हा कार्यक्षेत्रवाढीसाठी :

१) मागील ५ वर्षाचे लेखापरीक्षण वर्ग अ असावा.

२) वसूल भागभांडवल रु. ७५ लाख व गंगाजळी रु. २० लाख असावी.

३) संस्थेची थकबाकी ५ टक्क्यापेक्षा कमी असावी.

४) ठेवीतून कर्ज वाटप केलेले असावे.

५) संस्था नफ्यात असावी. किमान रु. ५ कोटी ठेवी असाव्यात.

६) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयीत कर्ज निधी उभारलेला असावा.

७) खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श उपविधी स्विकारलेले असावेत.

८) नवीन शाखा उघडणेचा प्रस्ताव :

संस्थेने शाखा उघडण्यासाठी परवानगी मागितल्यास अशा शाखेकडे संस्थेने किमान रु. ५० लाखाच्या ठेवी वर्ग करणे आवश्यक आहे व किमान सभासद संख्या किमान १००० असावी.

ड) एकापेक्षा अधिक विभागात कार्यक्षेत्र वाढीसाठी :

१) मागील ५ वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल अ वर्ग असावा.

२) वसूल भाग भांडवल रु. १ कोटी व गंगाजळी रु. २५ लाख असावा.

३) थकबाकीचे प्रमाण ५% पेक्षा कमी असावे.

४) ठेवीतून कर्जवाटप केलेले असावे.

५) संस्था नफ्यात असावी. किमान ठेवी रु. १० कोटी असाव्यात.

६) संस्थेने आवश्यक तो बुडीत व संशयीत कर्जनिधी उभारलेला असावा.

७) खात्याने प्रस्तुत केलेले आदर्श उपविधी स्विकारलेले असावेत.

८) नवीन शाखा उघडणेचा प्रस्ताव :

संस्थेने शाखा उघडण्यासाठी परवानगी मागितल्यास अशा शाखेकडे संस्थेने किमान रु. १ कोटी वर्ग करणे आवश्यक आहे व किमान सभासद संख्या १५०० असावी.

३) तालुका/शहर/जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या नागरी पतसंस्थांनी बृहन्मुंबई वॉर्डात शाखा उघडणेबाबत

राज्यातील मुंबई बाहेरील जिल्ह्यात कार्यरत असलेल्या नागरी पतसंस्थांतील सभासद नोकरी धंद्यानिमित्त व रोजगारीसाठी मुंबई शहरात येतात व मुंबई शहरातच स्थायिक होतात. ग्रामीण व अधिग्रामीण भागातून आलेल्या अशा व्यक्तींना त्यांचे मूळ नागरी पतसंस्थेकडून कर्जाची सोय उपलब्ध झाल्यास मुंबईसारख्या मोठ्या शहरात त्यांना मोठ्या कर्जाच्या गरजेसाठी बँका अगर सावकारांचे दार ठोठावण्याची वेळ येणार नाही. याकरिता मुंबई बाहेरील पतसंस्थेस तालुका कार्यक्षेत्राखाली ज्या अटी दिल्या आहेत त्या अटीस अधिन राहून अनुमती देण्यात यावी.

पतसंस्थांच्या कार्यक्षेत्रात वाढ देताना कार्यक्षेत्रातील पतसंस्थांच्या आर्थिक सक्षमतेचा विचार करून गुणवत्तेवर निर्णय घ्यावा. अस्तित्वात असलेल्या संस्थेस सुनावणीही देणे आवश्यक राहील.

शासनाची यापूर्वीची नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था नोंदणी व कार्यक्षेत्रवाढीसाठी दि. २७-३-१९९७ व ३१-५-२००१ ची सर्व परिपत्रके रद्द करण्यात येत आहे.

मा. सहकार आयुक्त यांच्या मान्यतेने

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे करीता.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा.क्र.ना. बँका/डी-४/ना.पत/नवीन शाखा/निर्बंध/०५
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक ५ एप्रिल २००५

# परिपत्रक

विषय : नागरी सहकारी पतसंस्थांना नवीन शाखा उघडणेस निर्बंध घालणेबाबत...

या कार्यालयाकडे तसेच संबंधीत निबंधक कार्यालयाकडे मोठ्या प्रमाणावर शाखा मागणी कामी प्रस्ताव दाखल केले जातात. अशा प्रस्तावाची छाननी केली असता, बऱ्याच संस्था या केवळ शाखांची संख्या वाढविण्यासाठीच नवीन शाखा मागणी करतात असे निदर्शनास आले आहे. तसेच काही संस्थांच्या शाखांची संख्या विचारात घेता या शाखांवर नियंत्रण ठेवणे, शाखांचा आढावा घेणे किंवा नियोजन करणे हे काम अत्यंत जिकीरीचे आहे. नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये सर्वसामान्य जनतेचा पैसा ठेवीच्या स्वरुपामध्ये असतो अशा परिस्थितीमध्ये एखाद्या शाखेतील घडलेल्या चुकीमुळे त्याचे परिणाम संस्थेस भोगावे लागल्याची व त्यामुळे ठेवीदारांचे हितास बाधा निर्माण झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. नागरी सहकारी पतसंस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी एन.पी.ए. तरतूद लागू करण्यात आलेली आहे. परिणामी अशा संस्थांच्या कामकाजावर नियंत्रण असणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे. अशा परिस्थितीत संस्थेच्या व सभासद ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीने व संस्थांची आर्थिक स्थिती सक्षम राहावी यासाठी खालीलप्रमाणे ठेवीच्या प्रमाणानुसार कमाल शाखा संख्या निश्चित करण्यात आलेली आहे.

| | पतसंस्था | शाखांची कमाल संख्या |
|---|---|---|
| १) | रु. ५ ते १० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या | ५ पेक्षा जास्त नाही |
| २) | रु. १० ते २५ कोटी पर्यंत ठेवी असलेल्या | १० पेक्षा जास्त नाही |
| ३) | रु. २५ ते ५० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या | १३ पेक्षा जास्त नाही |
| ४) | रु. ५० ते ७५ कोटी पर्यंत ठेवी असलेल्या | १६ पेक्षा जास्त नाही |
| ५) | रु. ७५ ते १०० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या | २० पेक्षा जास्त नाही |
| ६) | रु. १०० कोटीपेक्षा जास्त ठेवी असलेल्या | २५ पेक्षा जास्त नाही |

तरी वरील प्रमाणे सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याबाबत दक्षता घेण्यात यावी. ही बाब आपल्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांना आपल्या स्तरावरुनही अवगत करण्यात यावी.

सही/-
अप्पर निबंधक, सहकारी संस्था
(तपासणी व निवडणुका) महाराष्ट्र राज्य, पुणे

मा. सहकार आयुक्त
यांचे मान्यतेने

प्रति, १) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व) २) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

जा. क्र. ना. बँका/डी-४/नागरी पत/महिला सुधा. निकष/०५
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक ४ सप्टेंबर ००५

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) तालुका / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सर्व)

# परिपत्रक

## विषय : नागरी सहकारी पतसंस्थांचे महिलासाठी नोंदणीबाबत सुधारीत निकष

या कार्यालयाच्या दि. २१-८-२००४ च्या परिपत्रकानुसार नागरी सहकारी पतसंस्थांचे नोंदणीबाबत निकष विहित केलेले आहेत. सदर परिपत्रकातील निकष महिलांच्या नागरी सहकारी पतसंस्थांसाठी शिथिल करण्यास शासनाने जा. क्र. सीसीआर/११०५/प्र.क्र.३७५/७स दि. ७-७-२००५ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे महिलांच्या नागरी सहकारी पतसंस्था नोंदणीसाठी खालीलप्रमाणे निकष विहित करण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | नागरी विभागाचा प्रकार | कार्यक्षेत्र | प्राथमिक महिला पतसंस्थांसाठी सदस्य संख्या | भागभांडवल महिला पतसंस्था |
|---|---|---|---|---|
| १) | बृहन्मुंबई | जिल्हा | ७५० | २५ लाख |
| | पुणे | जिल्हा | ७५० | १५ लाख |
| | नागपूर | जिल्हा | ७५० | १५ लाख |
| | बृहन्मुंबई | एक वॉर्ड/प्रभाग | ७५० | १० लाख |
| २) | महानगरपालिका असलेली शहरे | एक वॉर्ड / प्रभाग | ५०० | ५ लाख |
| ३) | नगरपालिका असलेली शहरे | एक ते दोन वॉर्ड / प्रभाग | ४०० | २.५० लाख |
| ४) | अन्य नागरी व अधि. नागरी/ग्रामीण | एक गाव | ३५० | १ लाख |
| ५) | महिला व दुर्बल घटकांसाठी | एक वॉर्ड/एक गाव प्रभाग | २०० | १ लाख |
| ६) | तालुका | तालुका | ७५० | १.५ लाख |
| ७) | जिल्हा | जिल्हा | १.५०० | ५ लाख |

महिला नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणीसमयी निर्धारित भागभांडवलाच्या ५०% (पन्नास टक्के) भागभांडवल जमा करून घेणे आवश्यक आहे व उर्वरित भागभांडवल पुढील दोन वर्षात उभे करणे आवश्यक आहे. या अटीवर महिला नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणीस परवानगी देण्यात यावी. सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सही/-
अप्पर निबंधक सहकारी संस्था,
(तपासणी व निवडणूका) महाराष्ट्र राज्य, पुणे

जा. क्र. ना. बँका/डी-४/महाराष्ट्र अंधजन वि. पत/नों/०६
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
दिनांक २६-९-२००६

प्रति,
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
जि. उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
तालुका सहाय्यक/उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)

**विषय : महाराष्ट्र अंधजन विकास सहकारी पतसंस्था मर्या., मुंबई – नोंदणीबाबत....**
**संदर्भ : १) शासनाचे पत्र क्रमांक सीसीआर-११०४/प्र. क्र. ४११/७-स दि. १४-८-२००६**

वरील विषय व संदर्भाचे कृपया अवलोकन व्हावे.

शासनाचे दिनांक १४-८-२००६ चे पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार अंध व अपंग व्यक्तींच्या पतसंस्था या विशेष पतसंस्था समजून अशा पतसंस्थांना मान्यता देण्याकरिता सर्वसाधारण धोरण ठरविण्याच्या दृष्टीने अशा पतसंस्थांकरिता खालीलप्रमाणे निकष ठरविलेले आहेत.

| अ. क्र. | नागरी विभागाचा प्रकार | कार्यक्षेत्र | सदस्य संख्या | भागभांडवल |
|---|---|---|---|---|
| १) | बृहन्मुंबई | जिल्हा | ५०० | २० लाख |
| २) | पुणे | जिल्हा | ५०० | १५ लाख |
| ३) | नागपूर | जिल्हा | ५०० | १५ लाख |
| ४) | बृहन्मुंबई | वॉर्ड/प्रभाग | ५०० | १० लाख |
| ५) | महानगरपालिका असलेली शहरे | वॉर्ड/प्रभाग | ४०० | ५ लाख |
| ६) | नगरपालिका असलेली शहरे | वॉर्ड/प्रभाग | ३०० | २ लाख |
| ७) | अन्य नागरी व ग्रामीण शहरे | एक गाव | २०० | १ लाख |
| ८) | तालुका | तालुका | ३०० | २ लाख |
| ९) | जिल्हा | जिल्हा | ४०० | ३ लाख |
| १०) | तसेच अशा संस्था नोंदणीसाठी किंवा ९०% सभासद हे अंध/अपंग असणे आवश्यक राहील. | | | |

तरी यापुढे अंध व अपंग व्यक्तींच्या संस्था नोंदणी करताना वरीलप्रमाणे सुधारीत निकष विचारात घेऊन नोंदणी करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

मा. सहकार आयुक्त
यांचे मान्यतेने

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी
महाराष्ट्र राज्य, पुणे करिता

जा. क्र. ना. पत/डी-४/पत/का.वा./शाखा/नोंदणी/०७
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक ३१ डिसेंबर २००७

# परीपत्रक

## विषय : नव्याने नोंदणी करण्यात येणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणी, कार्यक्षेत्रवाढ व शाखा विस्ताराबाबत.

नागरी सहकारी पतसंस्थांचा भाग भांडवलाचा पाया भक्कम करण्याचे अनुषंगाने या कार्यालयाचे परीपत्रक जा.क्र.ना.बँका/डी-४ /नागरीपत/नों. का./सुधारीत निकष/२००४ दिनांक-२१/८/२००७ नुसार नागरी सहकारी पतसंस्थांच्या नोंदणी व कार्यक्षेत्रवाढीबाबतचे सुधारीत निकष लागू केलेले आहेत.

तसेच पतसंस्थांच्या शाखांच्या भरमसाठ वाढणाऱ्या संख्या विचारात घेता. अशा शाखांवर नियंत्रण ठेवणेचे अनुषंगाने या कार्यालयाने जा.क्र.ना.बँका/डी- ४/ना. पत/नविन शाखा/निबंध/०५ दिनांक ५/४/२००४ अन्वये पतसंस्थांना ठेवीच्या प्रमाणात शाखांची संख्या निश्चित केलेली आहे.

तथापि सद्याचे कालावधीत पतसंस्थांच्या ठेवी परत मिळत नसलेचे अनुषंगाने राज्यातील सर्व नागरी/ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या नोंदणी, कार्यक्षेत्रवाढ व नविन शाखा यांची संख्या मर्यादीत ठेवणे आवश्यक आहे.

सबब या परीपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, पतसंस्थेचे कार्यक्षेत्र हे कोणतेही असले तरी कोणत्याही पतसंस्थेची नोंदणी करताना, संस्थेस कार्यक्षेत्रवाढ मंजूर करताना तसेच संस्थेस नविन शाखा सुरु करण्यास मंजुरी देताना प्रथम या कार्यालयाची मान्यता घेण्यात यावी व तदनंतरच पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**अपर निबंधक सहकारी संस्था**
**(तपासणी व निवडणुका) महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई.
४) सहायक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन

जा.क्र.ना.बँका/डी-४/पतसंस्था/नोंदणी/निकष/२००८/९०७
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था.
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक - १८ जून २००८

प्रति,
१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) तालुका सहाय्यक/उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)

विषय : नागरी/ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था व महिला सहकारी पतसंस्था नोंदणी व कार्यक्षेत्रवाढीबाबतचे निकष सुधारीत करणे बाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.ना.बँका/डी-४/नागरीपत/नों.का./सुधारीत निकष/२००४ दिनांक- २१-८-२००४
२) या कार्यालयाने शासनास लिहिलेले पत्र जा.क्र.सम दिनांक २५-३-२००८
३) शासनाचे पत्र जा.क्र. सीसीआर-११०८/प्र.क्र.३४४/७-स, दिनांक १२-६-२००८

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

सद्यस्थितीत राज्यात सुमारे २६,००० पतसंस्था अस्तित्वात असून, पतसंस्थांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यातील काही पतसंस्था आर्थिक अडचणीत आल्याने त्या ठेवीदारांच्या ठेवी परत करु शकल्या नाहीत व अशा ठेवी परत करु न शकलेल्या पतसंस्थांचा आढावा घेताना अशा पतसंस्थांचा भांडवली पाया अधिक मजबूत करणे अत्यावश्यक असल्याची बाब उपस्थित झाल्याने संस्था नोंदणी बाबतचे निकष अधिक कडक करणेसाठी संदर्भीय दि. २५-३-२००८ चे पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. शासनाने संदर्भीय दि. १२-६-२००८ चे पत्रान्वये त्यास मान्यता दिलेली असून सुधारीत निकषाबाबतचे परीपत्रक या कार्यालयाचे स्तरावरुन निर्गमित करण्याबाबत व सदर सुधारीत निकषास शासनाची मान्यता असल्याचे नमूद करण्याबाबत या कार्यालयास निर्देश दिलेले आहेत. सबब संस्था नोंदणी, कार्यक्षेत्रवाढ तसेच महिला पतसंस्था नोंदणीबाबतचे सुधारीत निकष खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत. यापुढे राज्यात नागरी/ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था व महिला पतसंस्थांच्या नोंदणी व कार्यक्षेत्रवाढ इ. प्रकरणास मंजुरी देताना खालील निकषांची पूर्तता करणाऱ्या संस्थांच्या प्रकरणातच पुढील कार्यवाही करण्यात यावी.

## सुधारीत निकष

### अ. संस्था नोंदणी बाबत निकष :

नागरी सहकारी पतसंस्थाची संख्यात्मक वाढ मोठ्या प्रमाणात झालेली आहे. संस्थांची गुणात्मक वाढ व्हावी व संस्थांचा भागभांडवलाचा पाया बळकट होऊन संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी नवीन पतसंस्थांच्या नोंदणीचे प्रस्तावासाठी खालील प्रमाणे सुधारीत निकष विहित करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | नागरी विभागाचा प्रकार | कार्यक्षेत्र | प्राथमिक सदस्य संख्या | नोंदणी समयी भागभांडवल रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | बृहन्मुंबई | जिल्हा | ४,००० | ७५ लाख |
| | पुणे | जिल्हा | ४,००० | ५० लाख |
| | नागपूर | जिल्हा | ४,००० | ५० लाख |
| | बृहन्मुंबई | एक वॉर्ड/प्रभाग | ३,००० | ५० लाख |
| २) | महानगरपालिका असलेली शहरे | एक वार्ड/प्रभाग | २,५०० | २० लाख |
| ३) | नगरपालिका असलेली शहरे | एक ते दोन वॉर्ड/प्रभाग | २,००० | १० लाख |
| ४) | अन्य नागरी व अधि. नागरी/ग्रामिण | एक गाव | १,००० | ४ लाख |
| ५) | दुर्बल घटकांसाठी | एक वॉर्ड/एक गाव/प्रभाग | १,००० | २ लाख |
| ६) | तालुका तालुका | | २,५०० | ५ लाख |
| ७) | जिल्हा | जिल्हा | ५,००० | २० लाख |

अ) वरील निकषांची पूर्तता होणाऱ्या नियोजित पतसंस्थांची नोंदणी करण्यात यावी. नियोजित संस्था निकषांची पूर्तता करीत नसल्यास अशा संस्थांची नोंदणी नाकारण्यात यावी.

ब) नियोजित संस्थांची नोंदणी करण्यापूर्वी तिच्या कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या पतसंस्थांना सुनावणी देऊन त्यांचे म्हणणे ऐकून गुणवत्तेनुसार संबंधित अधिकाऱ्याने नोंदणी विषयक निर्णय घ्यावा.

## ब. कार्यक्षेत्र वाढी बाबत निकष :

नोंदणी झालेल्या पतसंस्थांचे कार्यक्षेत्रवाढीचे प्रस्तावासाठी खालील प्रमाणे सुधारीत निकष विहित करण्यात येत आहेत.

| प्रस्तावित कार्यक्षेत्रासाठी निकष | बृहन्मुंबई | तालुका | जिल्हा | विभाग/शेजारील जिल्हा | एकापेक्षा अधिक विभाग |
|---|---|---|---|---|---|
| मागील ५ वर्षाची ले.प. वर्गवारी | ५ वर्षे अ वर्ग असावा | २ वर्षे अ वर्ग असावा | ३ वर्षे अ वर्ग असावा | ५ वर्षे अ वर्ग असावा | ५ वर्षे अ वर्ग असावा |
| वसूल भागभांडवल | २ कोटी | २० लाख | ५० लाख | ७५ लाख | १ कोटी |
| राखीव निधी | २५ लाख | ५ लाख | १० लाख | २० लाख | २५ लाख |
| थकबाकीचे प्रमाण | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी | ५% पेक्षा कमी |
| ठेवीतून कर्जवाटप | केले असावे | केले असावे | केले असावे | केले असावे | केले असावे |
| किमान ठेवी | १० कोटी | ३ कोटी | ५ कोटी | ५ कोटी | १० कोटी |
| नफा | असावा | असावा | असावा | असावा | असावा |
| संशयीत व बुडीत निधी | असावा | असावा | असावा | असावा | असावा |

## क. नविन शाखा उघडण्याबाबतचे निकष

या कार्यालयाने दिनांक ५-४-२००५ चे परिपत्रकान्वये नागरी सहकारी पतसंस्थांना त्यांचे ठेवीचे निकषाचे आधारावर पुढीलप्रमाणे शाखा उघडण्यासाठी परवानगी मागितल्यास वरील परिपत्रकाप्रमाणे ठेवीच्या निकषांची पूर्तता होत असल्यास फक्त संस्थेच्या मंजूर कार्य क्षेत्रातच खालील अटीवर शाखा सुरु करण्यास मंजुरी देण्यात यावी.

| प्रस्तावित शाखेसाठी कार्यक्षेत्रानुसार अटी | बृहन्मुंबई जिल्हा | तालुका | जिल्हा | विभाग/शेजारील जिल्हा | एकापेक्षा अधिक विभाग |
|---|---|---|---|---|---|
| सदर नवीन शाखेकडे वर्ग करावयाच्या किमान ठेवी | ५०.०० लाख | १०.०० लाख | २५.०० लाख | ५०.०० लाख | १.०० कोटी |
| सदर नवीन शाखेकडे वर्ग करावयाचे किमान सभासद | १,००० | ५०० | ७५० | १,००० | १,५०० |

## ड. महिला पतसंस्था नोंदणी बाबतचे निकष :

महिला पतसंस्था नोंदणीबाबतच्या या कार्यालयाचे दिनांक ४/९/२००५ चे परिपत्रकात सुधारणा करण्यात आलेली असून महिला पतसंस्थांनी त्यांचे कार्यक्षेत्रानुसार नमूद केलेले भागभांडवल हे नोंदणी समयी पूर्णपणे उभे करणे अत्यावश्यक करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | नागरी विभागाचा प्रकार | कार्यक्षेत्र | सुधारीत निकष | |
|---|---|---|---|---|
| | | | प्राथमिक सदस्य संख्या | नोंदणी समयी भागभांडवल रुपये |
| १) | बृहन्मुंबई | जिल्हा | ७५० | २५ लाख |
| | पुणे | जिल्हा | ७५० | १५ लाख |
| | नागपूर | जिल्हा | ७५० | १५ लाख |
| | बृहन्मुंबई | एक वॉर्ड/प्रभाग | ७५० | १० लाख |
| २) | महानगरपालिका असलेली शहरे | एक वॉर्ड/प्रभाग | ५०० | ५ लाख |
| ३) | नगरपालिका असलेली शहरे | एक ते दोन वॉर्ड/प्रभाग | ४०० | २.५० लाख |
| ४) | अन्य नागरी व अधि. नागरी/ग्रामिण | एक गाव | ३५० | १ लाख |
| ५) | दुर्बल घटकांसाठी | एक वॉर्ड/एक गांव/प्रभाग | २०० | १ लाख |
| ६) | तालुका | तालुका | ७५० | १.५ लाख |
| ७) | जिल्हा | जिल्हा | १,५०० | ५ लाख |

पतसंस्थांची नोंदणी करताना तसेच कार्यक्षेत्रवाढ देताना व शाखा मंजूर करताना विभागातील पतसंस्थाची संख्या तसेच मागणी केलेल्या पतसंस्थेची आर्थिक सक्षमतेचा विचार करुन गुणवत्तेवर निर्णय घेण्यात यावा. संस्था नोंदणी करताना व शाखा विस्तार मंजूर करताना अस्तित्वात असलेल्या संस्थेच्या हरकती मागविणे/सुनावणी देणे आवश्यक राहील.

नागरी/ग्रामिण बिगरशेती व महिला पतसंस्था संस्था नोंदणी, कार्यक्षेत्रवाढ, शाखाविस्तार तसेच महिला पतसंस्था नोंदणी या बाबतची यापूर्वीची परिपत्रके रद्द करण्यात येत आहेत.

**स्थळ प्रतीवर मा. सहकार आयुक्त यांची सही असे.**

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता**

जा.क्र.ना. बँका/डी-४/पतसंस्था नोंदणी/कार्यक्षेत्र वाढ निर्बंध/२००८
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक :- ९ ऑगस्ट २००८

प्रति,
मा. प्रधान सचिव(सहकार व पणन)
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ३२

## विषय- राज्यात नागरी/ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था यांचे नोंदणीस निर्बंध घालणे बाबत.

उपरोक्त विषयाचे कृपया अवलोकन व्हावे.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, सद्यस्थितीत राज्यात सुमारे २६,००० पतसंस्था अस्तित्वात असून, पतसंस्थांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सन २००२ मध्ये भुदरगड नागरी पतसंस्था मर्या., गारगोटी, जि. कोल्हापूर ही रु.२५५ कोटींच्या ठेवी असलेली पतसंस्था आर्थिक अडचणीत आल्यानंतर राज्यातील पतसंस्था चळवळीला मोठा धक्का बसला.राज्यातील सर्वसामान्य जनता सर्वच पतसंस्थांकडे संशयाने बघू लागल्यामुळे अशा वेळेस सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी व पतसंस्थांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. उदा. पतसंस्थांच्या ठेवी व कर्ज व्याजदरातील अनिष्ठ स्पर्धा टाळून पतसंस्थांचे उपविधी समान असावेत व आर्थिक व्यवहारामध्ये एकसुत्रीपणा यावा यासाठी सर्व पतसंस्थांना एकच सुधारीत आदर्श उपविधी लागू करण्यात आला, ठेवी व कर्ज व व्याजदरात समानता आणण्यात आली, संस्थांना मालमत्तेमध्ये गुंतवणूक करण्यास मुभा देण्यात आली. पतसंस्थांच्या नोंदणी, कार्यक्षेत्रवाढ व शाखा विस्तारासाठी कठोर निकष करण्यात आले. अपसेट प्राईस ठरविण्याबाबतचे अधिकार कनिष्ठ कार्यालयांना प्रदान करण्यात आले, पतसंस्थांच्या कर्मचारी व संचालकांना प्रशिक्षण सक्तीचे करण्यात आले, इ.

. वरीलप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेतानाच पतसंस्थांची वाढती संख्या विचारात घेऊन शासन मान्यतेने पतसंस्था नोंदणी व कार्यक्षेत्रवाढीबाबतचे निकष या कार्यालयाचे दि. २१-८-२००४ चे परिपत्रकान्वये अधिक कठोर करण्यात आले. जेणेकरुन नवीन पतसंस्था नोंदणीस व पतसंस्थांच्या कार्यक्षेत्रवाढीस काही प्रमाणात प्रतिबंध निर्माण झाला. दरम्यान सन २००७ मध्ये राज्यातील काही पतसंस्था आर्थिक अडचणीत आल्याने त्या ठेवीदारांच्या ठेवी परत करु शकल्या नाहीत व अशा ठेवी परत करु न शकलेल्या पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याचे अनुषंगाने जेष्ठ समाजसेवक मा. आण्णा हजारे यांनी सुरु केलेले जनआंदोलनाचे अनुषंगाने राज्यातील पतसंस्थांची संख्या आणखी नियंत्रित करणे आवश्यक असल्याची बाब उपस्थित झाल्याने अडचणीतील पतसंस्थांचे सक्षम पतसंस्थेमध्ये विलनीकरण करण्यात आले तर पतसंस्था नोंदणी बाबतचे निकष अधिक कठोर

करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. शासन मान्यतेने या कार्यालयाने दि. १८-६-२००८ चे परिपत्रकान्वये अधिक निकष कठोर केले.

दरम्यान मा. प्रधान सचिव (सहकार व पणन) यांनी सहकार आयुक्त कार्यालयात आढावा सभा घेताना यापुढे किमान ५ वर्षे राज्यात कोणत्याही पतसंस्थेची नोंदणी न करण्याबाबत व पतसंस्थांना कार्यक्षेत्रवाढ मंजूर न करण्याबाबतचे निर्देश देऊन तसा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सूचित केलेले आहे. सद्यस्थितीत राज्यात सुमारे २६,००० पतसंस्था अस्तित्वात असून, पतसंस्थांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे तसेच दिवसेंदिवस पतसंस्था नोंदणीचे प्रमाण वाढत आहे. अनेक पतसंस्था या कार्यक्षेत्र विस्तारामुळे राज्यस्तरीय/ विभागस्तरीय जिल्हास्तरीय होत आहेत. पतसंस्थांची संख्या जास्त असल्यामुळे पतसंस्थांच्या दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवणे अशक्य होते व अशा परिस्थितीत एखादी पतसंस्था आर्थिक अडचणीत आल्यास त्याचा विपरीत परीणाम पतसंस्था चळवळीवर होतो. त्यामुळे राज्यातील सद्यस्थितीतील पतसंस्थांची संख्या विचारात घेता, यापुढे राज्यात आणखी किमान ५ वर्षे तरी कोणत्याही पतसंस्थेची नोंदणी करणे पतसंस्था चळवळीचे दृष्टीने योग्य होणार नाही असे या कार्यालयाचे मत झाले असून यापुढे राज्यात कोणत्याही पतसंस्थेची नोंदणी किमान ५ वर्षे न करण्याबाबत व कोणत्याही पतसंस्थेला कार्यक्षेत्रवाढ मंजूर न करण्याबाबतचे आदेश शासनस्तरावरुन निर्गमित करण्यात येण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

तरी वरीलप्रमाणे यापुढे राज्यात किमान ५ वर्षे कोणत्याही पतसंस्थेची नोंदणी न करण्याबाबतचे व कोणत्याही पतसंस्थेला कार्यक्षेत्र वाढ मंजूर न करण्याबाबतचे आदेश शासनस्तरावरुन निर्गमित करण्यात यावेत अशी शासनास विनंती करण्यात येत आहे.

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

जा. क्र. ना. पत/डी–४/पतसंस्था/शाखाविस्तार/०८
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे –१ यांचे कार्यालय,
दिनांक ९ ऑगस्ट २००८

# परिपत्रक

**विषय : राज्यातील कोणत्याही पतसंस्थेला नवीन शाखा सुरू करण्यास परवानगी न देणेबाबत**

सद्यस्थितीत राज्यात सुमारे २६,००० सहकारी पतसंस्था असून, त्यांच्या अनेक शाखा कार्यरत आहेत. संस्थांच्या अनेक शाखांमुळे संस्था चालकांना संस्थेच्या सर्व शाखांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. परिणामी एखाद्या शाखेच्या चुकीच्या कामकाजामुळे/निर्णयामुळे त्याचा विपरीत परिणाम त्या पतसंस्थेच्या सर्व शाखांवर होतो व सर्व पतसंस्था चळवळीला गंभीर परिणाम भोगावे लागतात.

पतसंस्थांच्या शाखांच्या भरमसाठ वाढणाऱ्या संख्या विचारात घेता, अशा शाखांवर नियंत्रण ठेवणेचे अनुषंगाने या कार्यालयाने जा. क्र. ना बँका/डी–४/ना. पत/नवीन शाखा/निर्बंध/०५ दि. ५–४–२००४ अन्वये पतसंस्थांना ठेवींच्या प्रमाणात शाखांची संख्या निश्चित करून निर्बंध घातलेले होते.

तथापि सद्याचे कालावधीत पतसंस्थांच्या ठेवी परत मिळत नसलेचे अनुषंगाने सुरू झालेले जनआंदोलन पहाता त्यामध्ये पतसंस्थांच्या अनेक शाखा असल्यामुळेही काही पतसंस्था मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणीत आल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे राज्यातील सर्व नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या नवीन शाखांची संख्या मर्यादित ठेवणे आवश्यक झाल्याने या कार्यालयाने संदर्भीय दि. ३१–१२–२००७ चे परिपत्रकान्वये, पतसंस्थेचे कार्यक्षेत्र हे कोणतेही असले तरी कोणत्याही संस्थेस नवीन शाखा सुरु करण्यास मंजुरी देताना प्रथम या कार्यालयाची मान्यता घेण्याबाबत निर्देश सर्व निबंधक यांना देण्यात आलेले होते.

मात्र याबाबत गेल्या सहा महिन्यामध्ये राज्यातून अनेक प्रकरणे शाखा विस्तारास मंजुरी मिळणेकामी या कार्यालयास प्राप्त होत आहेत व त्यामुळे या कार्यालयाचा नाहक वेळ वाया जात आहे. वाढत्या शाखांच्या संख्येमुळे ही पतसंस्था आर्थिक अडचणीत येत असल्याने संस्थांच्या शाखांवर बंदी घालणेचे योग्य होईल असे सहकारी संस्थांचा निबंधक या नात्याने माझी खात्री झालेली आहे.

सबब या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, या कार्यालयाकडून पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत यापुढे राज्यातील कोणत्याही पतसंस्थेला नवीन शाखेस परवानगी देण्यात येऊ नये.

सर्व संबंधीत निबंधक यांनी या बाबतची दक्षता घेऊन यापुढे राज्यात कोणत्याही पतसंस्थेला नवीन शाखा सुरु करण्यास मंजुरी देऊ नये.

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति, : १) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व) २) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व) ३) अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई ४) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन. ●●●